महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग,
दालन क्र.३४५,तिसरा मजला,ॲनेक्स इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दुरध्वनी क्र.०२२ २२०४५५६४ ई-मेल :vilasini.ghodke@nic.in

---

क्रमांक:संकिर्ण-२०२३/प्र.क्र.६२ /का.१० दिनांक :- ०८ ऑक्टोबर,२०२४

प्रति,

संचालक,
माहिती तंत्रज्ञान संचालनालय,
सामन्य प्रशासन विभाग,मंत्रालय,
मुंबई.

विषय:-<u>दरपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर प्रकाशित करण्याबाबत.</u>
(विधि व न्याय विभाग,मंत्रालय, मुंबई (खुदद) विभागासाठी एक ड्युप्लेक्स हेवी डयुटी झेरॉक्स मशिन दि.०१.११.२०२४ ते दि.३१.१०.२०२५ या एक वर्षाच्याकालावधी करिता भाडेतत्वावर (देखभाल-दुरुस्तीसह ,सुटे भाग पुरवठा, कागद आणि यंत्रचालकासह भाडेतत्वावर घेण्याबाबत.)

महोदय,

विधि व न्याय विभाग (खुद्द), मंत्रालय, मुंबई करिता सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षामध्ये (दि.०१.११.२०२४ ते दि.३१.१०.२०२५) या कालावधीकरिता एक नवीन,हेवी डयुटी (FAST SPEED),झेरॉक्स मशिन, भाडेतत्वावर घेण्याची आवश्यकता आहे. या विभागामार्फत केवळ वीज व जागा पुरविण्यात येईल. सदरहू झेरॉक्स मशीनची सर्व प्रकारची देखभाल-दुरुस्ती, टोनर, टोनरमधील शाई भरणे, कागद व तद्नुषंगीक अन्य सर्व खर्च आणि झेरॉक्स यंत्रचालक उपलब्ध करुन त्याच्या वेतनावरील खर्च संबंधित पुरवठादारानेच करावयाचा आहे.

२. वरील अनुषंगाने विधि व न्याय विभागास,एक झेरॉक्स मशिन, भाडेतत्वावर देण्याबाबत आपल्या संस्थेचे, वेगवेगळया साईजच्या, प्रती, पानाचे (PER COPY) दरपत्रक, सोबत जोडलेल्या भाग-१ (तांत्रिक निविदा-अ) आणि भाग-२ (अतांत्रिक निविदा-ब) भरुन व तसा पाकिटावर उल्लेख करून २ स्वतंत्र पाकिटे बनवून व ती दोन्ही पाकिटे एका मोहोरबंद लिफाफ्यात (1 SEALED ENVELOPE) घालून या विभागातील कक्ष अधिकारी(का.१०) (नोंदणी शाखा), विधि व न्याय विभाग, ३ रा मजला, विस्तार इमारत, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई ४०००३२ यांचेकडे दि. २२/१०/२०२४ पर्यंत कार्यालयीन वेळेमध्ये (सकाळी १०.०० ते दुपारी ५.३० वाजेपर्यंत) कृपया द्यावीत.

३. <u>या विभागाकडे दरपत्रक सादर करताना खाली नमूद केलेल्या नियम, अटी व शर्ती विचारांत घेऊन त्यानंतरच दरपत्रके सादर करण्याची विनंती आहे.:-</u>

१. संस्थेला सन २०२४-२०२५ (दि.०१.११.२०२४ ते दि.३१.१०.२०२५) या कालावधीकरिता ऑल इन वन सुविधेसह, प्रति मिनिट जास्तीत जास्त पाठपोठ प्रती, देणारी, एक ड्युप्लेक्स हेवी ड्युटी झेरॉक्स मशीन भाडे तत्वावर पुरविण्याबाबतचा करार करावा लागेल. (सध्या सरासरी सुमारे ४०,००० झेरॉक्स प्रती दर महिन्यात काढाव्या लागतात)

२. झेरॉक्स मशीन शक्यतो संपूर्णतः नवीन असावी. (खरेदी वर्ष. MRP किमंत, मॉडेल व यंत्र क्रमांक, यंत्राच्या सुविधेसह नमूद करावे.)

३. मशीनच्या छपाईचा दर्जा सर्वोत्तम व टिकाऊ असणे आवश्यक आहे.

४. मशीनचे किमान मासिक भाडे व त्यामध्ये देण्यात येणा-या कमाल प्रतींची संख्या नमूद करावी व कमाल प्रतीपेक्षा जादा होणाऱ्या प्रतीबाबतचे प्रती प्रत दर नमूद करण्यात यावेत.

५. दर सर्व करांसहित (Including GST) व सर्व करांविरहीत अशा दोन्ही पध्दतीने स्पष्टपणे नमूद करावेत.

६. विभागातर्फे फक्त मशीन ठेवण्यासाठी जागा व वीज यांचा पुरवठा करण्यात येईल.

७. कागदाचा खर्च,मशीनच्या टोनरचा खर्च, टोनरमधील शाई भरण्याचा खर्च, दुरुस्तीच्या भागासह खर्च, मशीन चालकाचा खर्च व आवर्ती खर्च पुरवठादाराने करावयाचा आहे. त्याचे प्रदान विभागामार्फत केले जाणार नाही.

८. दरपत्रक फॉर्ममध्ये पुरवठा करण्यात येणाऱ्या झेरॉक्स मशीनद्वारे प्रति पृष्ठ झेरॉक्स काढण्यासाठी नमूद करण्यात आलेले (सर्व करांसह) दर हे दरपत्रक स्विकृती नंतर एक वर्षासाठी अस्तित्वात राहतील. त्यामध्ये सदर झेरॉक्स मशीनची देखभाल दुरुस्ती, त्यासाठी आवश्यक सुटे भाग, टोनर इ. सर्व बाबींचा समावेश राहील. तसेच विभागाच्या कामाची गैरसोय न होता मशीनच्या देखभाल / दुरुस्तीची जबाबदारी पुरवठादाराची राहील. कामाच्या दिवसांमध्ये मशीन बंद राहिल्यास व ते तात्काळ दुरुस्त न केल्यास तेवढया बंद असलेल्या दिवसांचे भाडे मासिक सरासरीने कमी करण्यात येईल.

९. झेरॉक्स मशीनचा पुरवठा विभागास केल्यानंतर विभागाच्या कामाची गैरसोय होऊ न देण्याची हमी पुरवठादाराने द्यावी. केवळ करार मिळावा म्हणून हे दरपत्रक पुरवठादाकडून सादर करण्यात आलेले नसून पुरवठादाराने दरपत्रकामध्ये जो दर टाकला आहे, त्यामध्ये विभागास सदरहू झेरॉक्स मशीनची देखभाल-दुरुस्ती सेवा तत्पर पुरविणे पुरवठादारास सहज शक्य आहे, असे दरपत्रक भरताना स्पष्टपणे नमूद करावे. विभागाकडून सदर मशीन देखभाल-दुरुस्ती संदर्भात येणारा प्रत्येक फोनकॉल पुरवठादाराने तातडीने स्विकारण्याची दक्षता घ्यावी किंवा काही कारणास्तव तो त्यावेळी फोन कॉल घेऊ न शकल्यास पुढील अर्ध्या तासात पुरवठादाराने संबंधितांस रिटर्न कॉल करावा.

१०. मशीनच्या देखभाल-दुरुस्तीची संपूर्ण जबाबदारी पुरवठादाराची असून कार्यालयीन कामकाजाच्या दिवसांमध्ये सदर झेरॉक्स मशीन बंद न राहू देण्याची व त्यामध्ये काही बिघाड झाल्याचा कॉल विभागाकडून आल्यापासून पुढील कमाल ४ तासांच्या आत दुरुस्त करून देण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील. मशीन लवकर दुरुस्त होण्यासारखी नसल्यास पुरवठाराने विभागास त्याऐवजी दुसरे कार्यरत असणारे मशीन त्वरीत उपलब्ध करून द्यावे.

११. कराराचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर पुढील करार अस्तित्वात येईपर्यंत पुरवठादाराला स्विकृत दराने झेरॉक्स मशीनची सेवा चालू ठेवणे बंधनकारक राहील.

१२. झेरॉक्स मशीनवर काढलेल्या प्रतीमहा प्रतींचे मशीनवरील मिटर रिडींग संबंधित अधिकारी/ कर्मचाऱ्याच्या समक्ष, प्रत्येक महिन्याच्या १ तारखेला (त्या तारखेस सुट्टी असल्यास त्याच्या दुसऱ्या दिवशी सकाळी) घेऊन ते त्यांच्याकडून विभागातील संबंधित अधिकाऱ्यांकडून प्रमाणित करून लगतच्या महिन्यात नियमित ठराविक दिनांकास सादर करण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील..

१३. भाडेतत्वावर झेरॉक्स मशीनचा पुरवठा केल्यानंतर कार्यालयीन कामकाजांच्या दिवशी मशीनवर काढलेल्या प्रतीबाबतचे देयक प्रतिमहा विभागास सादर करावे. त्यानंतर मासिक देयके विभागाकडून अदा करण्यात येतील. देयकाची रक्कम स्विकारताना मुद्रांकीत पावती या विभागाच्या रोखशाखेस देणे बंधनकारक आहे. प्रशासकीय कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब झाल्यास, विलंब आकार किंवा व्याज देय राहणार नाही.

१४. दरपत्रक व त्यासोबत द्यावयाचे प्रपत्र भरुन सादर करण्याचे ठिकाण ,कक्ष अधिकारी (का. १०) (नोंदणी शाखा), विधि व न्याय विभाग ३ रा मजला, विस्तार इमारत, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई ४०००३२ येथे दि.२२/१०/२०२४ पर्यंत कार्यालयीन वेळेमध्ये (सकाळी १०.०० ते दुपारी ५.३० वाजेपर्यंत) मोहोरबंद लिफाफ्यात पाठवावेत. त्यानंतर आलेली दरपत्रके स्विकारण्यात येणार नाहीत.

१५. मोहोरबंद लिफाफ्यावर "कार्यालयीन वापरासाठी झेरॉक्स मशीन भाडे तत्वावर पुरवठा करण्याबाबत दरपत्रके" असे लिहिणे आवश्यक आहे. या लिफाफ्यामध्ये तांत्रिक व अतांत्रिक असे दोन फॉर्म, २ स्वतंत्र बंद लिफाफ्यामध्ये (सोबत जोडलेल्या नमुन्याप्रमाणे) तशा उल्लेखासह भरणे आवश्यक आहे.

१६. उद्योग संचालनालय किंवा माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाचा दरकरार लागू करण्यात आल्यास त्या दिवसापासून निविदाधारकाबरोबर केलेला दरकरार संपुष्टात येईल.

१७. भाडे कराराच्या कालावधीमध्ये संबंधित पुरवठादार / संस्था यांचेकडून प्रस्तावित करण्यात आलेल्या सेवा कराराच्या अटी व शर्तीमध्ये शासनास असमाधानकारक सेवा अनुभवास आल्यास, म्हणजे कराराचे पालन समाधानकारकपणे न झाल्यास सेवा करार भंग करण्याचे अधिकार, शासनाने राखून ठेवले आहेत. तसेच काही परिस्थितीमुळे कराराची मुदत वाढविणे याबाबतचा अंतिम निर्णय शासनाचा राहील.

१८. सदरहू सर्व अटी व्यक्तिशः (निविदा सादरकर्ता म्हणून) नीट वाचून, त्या समजून घेऊन त्या मान्य असल्याचे नमूद करुन त्यानंतरच दरपत्रके सादर करणे बंधनकारक राहील

सोबत:-तांत्रिकदरपत्रक (फॉर्म-अ)
अतांत्रिक दरपत्रक (फॉर्म-ब)

आपली,

(वै.शि.डिगे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

कार्यालयीन झेरॉक्स प्रती काढण्यासाठी सन २०२४-२०२५ मध्ये
दि.०१.११.२०२४ ते दि.३१.१०.२०२५ या कालावधीकरिता भाडेतत्वावर
एक झेरॉक्स मशीन, त्यासाठी लागणारे शाई टोनर व देखभाल
दुरुस्तीसह सुटे भाग पुरवठा करण्याबाबत दरपत्रक

भाग-१ : तांत्रिक दरपत्रक (फॉर्म-अ)

| | | |
|---|---|---|
| १ | पुरवठादार संस्थेचे नाव | |
| २ | संपूर्ण पत्ता / कार्यालय | |
| ३ | दुरध्वनी (कार्यालय) | |
| | ई-मेल | |
| | भ्रमणध्वनी (MOBILE) | |
| ४ | प्रपत्र भरुन देण्याचा अंतिम दिनांक | दि. २२.१०.२०२४ रोजी दुपारी ५.३० वाजेपर्यंत |
| ५ | आयकर नोंदणी क्रमांक (पॅन कार्ड) | |
| ६ | GST REGISTRATION NO. | |
| ७ | Income Tax Return of the last year | |
| REGISTRATION CERTIFICATE सोबत जोडणे आवश्यक आहे. | | |

विभागामार्फत महत्वाची सुचना : दरामध्ये तसेच दरपत्रकात कागदपत्रात कोठेही खाडाखोड, ओव्हररायटींग (गिरवणे), पांढरी शाई लावणे टाळावे. चुकून तसे करावे लागल्यास पूर्ण स्वाक्षरी करावी. तसे न केल्यास दरपत्रक रद्द करण्याचे अधिकार शासनाने राखून ठेवले आहेत. तसेच, दर काहीही लावण्यात आले तरी, पुरवठादाराची सेवा अन्य ठिकाणी कशी आहे, याबाबत बाहयस्तोत्रांमार्फत चौकशी करुन त्यानंतरच दरपत्रक स्विकारण्याचे अधिकार शासनाने राखून ठेवले आहेत.

दिनांक :

स्थळ :

दरपत्रकधारकाचे नाव, स्वाक्षरी व शिक्का

विधि व न्याय विभाग,
३ रा मजला, मंत्रालय विस्तार इमारत,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई ४०००३२.
दुरध्वनी क्रमांक २२०४५५६४

कार्यालयीन झेरॉक्स प्रती काढण्यासाठी सन २०२४-२०२५ मध्ये
दि.०१.११.२०२४ ते दि.३१.१०.२०२५ या कालावधीकरिता भाडेतत्वावर
एक झेरॉक्स मशीन, त्यासाठी लागणारे शाई टोनर व देखभाल
दुरुस्तीसह सुटे भाग पुरवठा करण्याबाबत दरपत्रक

भाग-२ : अतांत्रिक दरपत्रक (फॉर्म-ब)

| | | | |
|---|---|---|---|
| १ | दि. .०१.११.२०२४ ते दि.३१.१०.२०२५ या कालावधीकरिता ऑल इन वन सुविधेसह प्रति मिनिट जास्तीत जास्त पाठपोठ प्रती देणारी **एक हेवी डयुटी (FAST SPEED) झेरॉक्स मशीन भाडे तत्त्वावर पुरविण्याबाबतचा करार** करण्यासाठी दरपत्रक सादर करण्यात येत आहे. | | |
| २ | झेरॉक्स मशीन ही संपूर्णत: नवीन असल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे. (खरेदी वर्ष, MRP किमंत, मॉडेल व यंत्र क्रमांक, यंत्राच्या सुविधेसह पुढीलप्रमाणे नमूद करण्यात येत आहे.) | | |
| | अ | खरेदी वर्ष | |
| | ब | MRP किमंत | |
| | क | मॉडेल व यंत्र क्रमांक | |
| | ड | यंत्राच्या सुविधा | |
| ३ | मशीनच्या छपाईचा दर्जा सर्वोत्तम व टिकाऊ असल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे. | | |
| ४ | अ | मशीनचे मासिक प्रती निहाय भाडे | |
| | (प्रति प्रत किती पैसे ते स्पष्टपणे नमूद करावे)<br>तसेच सदर दर GST सह आहे किंवा नाही तेही नमूद करावे.<br>सर्व करांसहित नमूद केलेले दरच विचारात घेण्यात येतील. | | |
| | ब | किमान प्रतीपेक्षा जादा होणाऱ्या प्रतींचा प्रती प्रत सवलतीचा दर | |
| | (सरासरी प्रतिमहा ४०,०००, प्रतींपेक्षा अधिक प्रती निघाल्यास काही सवलत असेल काय ते स्पष्टपणे नमूद करावे) | | |
| ५ | सदरहू दर सर्व (INCLUDING GST) करांसहित आहेत / नाहीत.<br>(स्पष्टपणे नमूद करावे व कर असल्यास त्याचा तपशील द्यावा) | | |
| ६ | GST स्वतंत्र लावण्यात येणार आहे / | | |

| | |
|---|---|
| | नाही असल्यास त्याचा दर |
| ७ | विभागातर्फे फक्त मशीन ठेवण्यासाठी जागा व वीज यांचा पुरवठा करण्यात येईल. |
| ८ | मशीनच्या टोनरचा खर्च, टोनरमधील शाई भरण्याचा खर्च, दुरुस्तीच्या भागासह खर्च व आवर्ती खर्च कागदासह संपूर्णत: पुरवठादारामार्फत करण्यात येईल. |
| ९ | निविदा फॉर्ममध्ये पुरवठा करण्यात येणाऱ्या प्रती झेरॉक्स मशीनद्वारे प्रति पृष्ठ झेरॉक्स काढण्यासाठी नमूद करण्यात आलेले (सर्व करांसह) दर हे निविदा स्विकृतीनंतर एक वर्षासाठी अस्तित्वात राहतील. त्यामध्ये सदर झेरॉक्स मशीनची देखभाल दुरुस्ती, त्यासाठी आवश्यक सुटे भाग, टोनर इ. सर्व बाबींचा समावेश राहील. |
| १० | झेरॉक्स मशीनचा पुरवठा विभागास केल्यानंतर विभागाच्या कामाची गैरसोय होऊ न देण्याची हमी पुरवठादारकाकडून देण्यात येत आहे. केवळ कॉन्ट्रक्ट मिळावे म्हणून दरपत्रक पुरवठादाकडून सादर करण्यात आलेली नाही. पुरवठादाराने निविदेमध्ये जो दर टाकला आहे. त्यामध्ये विभागास सदरहू झेरॉक्स मशीनची देखभाल-दुरुस्ती सेवा सत्वर पुरविणे पुरवठादारास सहजशक्य आहे. विभागाकडून सदर मशीन देखभाल-दुरुस्ती संदर्भात येणारा प्रत्येक फोनकॉल पुरवठादारकडून तातडीने स्विकारला जाईल किंवा काही कारणास्तव तो त्यावेळी घेऊ न शकल्यास पुढील अर्ध्या तासाच्या आत पुरवठादारकडून रिटर्न कॉल करण्यात येईल. |
| ११ | मशीनच्या देखभाल-दुरुस्तीची संपूर्ण जबाबदारी पुरवठादाराची असून कार्यालयीन कामकाजाच्या दिवसांमध्ये सदर झेरॉक्स मशीन बंद न राहू देण्याची व त्यामध्ये काही बिघाड झाल्याचा कॉल विभागाकडून आल्यापासून ते पुढील कमाल ४ तासांच्या आत दुरुस्त करुन देण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील. मशीन लवकर दुरुस्त होण्यासारखे नसल्यास पुरवठाराकडून विभागास त्याऐवजी दुसरे कार्यरत मशीन त्वरीत उपलब्ध करुन देण्यात येईल. |
| १२ | कराराचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर पुढील वर्षाचा करार अस्तित्वात येईपर्यंत पुरवठादाराकडून विभागामध्ये सन२०२३-२०२४ (कालावधी दि.०१.०७.२०२३ ते दि.३०.०६.२०२४) करिता स्विकृत केलेल्या दरानेच झेरॉक्स मशीन कार्यरत ठेवण्यात येईल. |
| १३ | झेरॉक्स मशीनवर काढलेल्या प्रतीमहा प्रतींचे मशीनवरील मिटर-रिडींग सबंधित अधिकारी/कर्मचाऱ्या समक्ष प्रत्येक महिन्याच्या एका ठराविक तारखेस (त्या तारखेस सुट्टी असल्यास त्याच्या दुसऱ्या दिवशी सकाळी) घेऊन ते त्यांच्याकडून विभागातील संबंधित अधिकाऱ्याकडून प्रमाणित करुन घेण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील. |
| १४ | कार्यालयीन भाडेतत्वावर झेरॉक्स मशीनचा पुरवठा केल्यानंतर कार्यालयीन कामकाजांच्या दिवशी मशीनवर काढलेल्या प्रतींबाबतचे देयक प्रतिमहा विभागास सादर करण्यात येईल. प्रत्येक वेळी देयकाची रक्कम स्विकारताना मुद्रांकित पावती या विभागाच्या रोखशाखेस देण्यात येईल. प्रशासकीय कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब झाल्यास, विलंब आकार किंवा व्याज देण्यात येणार नाही. |

| | |
|---|---|
| १५ | भाडे कराराच्या कालावधीमध्ये संबंधित पुरवठादार/संस्था यांचेकडून प्रस्तावित करण्यात आलेल्या सेवा कराराच्या अटी व शर्तींमध्ये शासनास असमाधानकारक सेवा प्रत्ययास आल्यास, म्हणजे कराराचे पालन समाधानकारकपणे न झाल्यास सेवा करार भंग करण्याचे अधिकार शासनाने राखून ठेवले आहेत. तसेच, कराराची मुदत वाढविणे याबाबतचा अंतिम निर्णय शासनाचा राहील. |

वरील सर्व अटी मी व्यक्तिशः (निविदा सादरकर्ता म्हणून) नीट वाचलेल्या असून त्या मला पूर्णपणे मान्य आहेत व त्यानंतरच मी ही निविदा सादर करीत आहे.

दिनांक :

स्थळ :

दरपत्रकधारकाचे नाव, स्वाक्षरी व शिक्का